# वारकरी संप्रदाय आणि मराठवाड्यातील संताचे कार्य :– एक अभ्यास

मोरे सोनल गिरधारी*

संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,
मालवानचल विद्यापीठ, इंदोर (मध्यप्रदेश), भारत

***Email ID:*** *sonalmore1218@gmail.com*

**Accepted**: 06.09.2022 **Published**: 01.10.2022

**मुख्य शब्दः** वारकरी संप्रदाय।

**शोध आलेख सार**

*महाराष्ट ही संताची भूमी म्हणून ओळखळी जाते याच संतांनी भक्ति भावाने व्यक्तिच्या सामजिक व धर्मिक जीवनात परिवर्तन घडवून आणले. मध्ययुगात महाराष्टींतिल धर्मिक व सामजिक जीवन अधःपतित होत चालले होते. वैंदिक धर्माच्या उज्वळ परंपरेत कर्मठता व पढिक पांडित्य यांनी व्यक्तीचे जीवन नकोसे करुण टाकले होते. स्वतःला पंडित समजून घेणारे वैंदिक पंडित यज्ञ आणि वेद मंत्राचे दुरुपयोग करीत होते व स्वार्थ साधूपणा करीत होते. अज्ञान भिती यामुळे सामान्य लोक जाखाई जोखाई या देवतेकडे आकर्षित होऊ लागले होते. मग त्यातच जादूटोणा भूतबाधा जागरण मारण मंत्रतंत्र यांच्या जोखडात अडकळी जात होती. अशाच परिस्थितीत वैंदिक धर्माविरुध्द बंड पूकारुन काही संप्रदाय उदयास आले. अशावेळी वैंदिक धर्माचे रक्षण करण्यासाठी सातशे वर्षापूर्वी वारकरी संप्रदाय निर्माण झाला. या चळवळीच्या मूळाशी तत्विक मूल्याचा आचार – विचार प्रणाळीचा साधन सुचिकतेच व नामस्मरणात्मक सहज साध्य भक्ति साधनेचा प्रभाव सर्वसाधारण जनतेवर पडला. समाज या विचाराने प्रभावित झाला व समाजातील बहुसंख्य जनता या विचार प्रणालीकडे आकर्षित झाली. संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या समकालीन संतांनी यात मोठे योगदान दिले. ते वारकरी चळवळीला पुढे नेण्यासाठी उपयुक्त ठरलेले आहे. मराठवाडयातील मध्ययुगीन काळखंडापासून सहित्याची समृध्द परंपरा आहे। मराठवाडा हा उत्तर भारतीय आर्य आणि दक्षिण भारतीय द्रविडांच्या संस्कृतीची संयोगभूमी असलेला प्रदेश आहे। सामजधारणा भक्ति आणि धर्मिक कार्यात मराठवाडयाने समन्वयायी भूमिका निभावलेली आहे.*

**पहचान निशान**

**Corresponding Author*

**शोध निबंधाची आवश्यकता :–**

आधुनिक काळात बदलत चाललेली सहित्यमूल्य सहित्य विषयक दृस्तीकोन यातुन

प्रचिन व मध्ययुगीन  काळखंडात निर्माण झाळेल्या सहित्याचा विसर पडू नये व संत सहित्याचा अभ्यास वाढावा जुन्या मूल्यांची जोपासना व्हावी आधुनिक सहित्याला  प्रेरणा देणारे व विचारांची पूर्ण मांडणी व्हावी वास्तवाबरोबरच भक्तिवाद अध्यात्मीकवाद, सत्य शांती विवेक वैंराग्य व आत्मीक समाधान या गुणांची जोपासणा व्हावी म्हणून वारकरी सांप्रदाय आणि मराठवाडयातील संताचे कार्य : एक अभ्यास या विषयाची आवश्यकता आहे.

**वारकरी संप्रदायाचा अर्थ :—**

वारकरी या सामजिक शब्दात वारी . कर अशी दोन पदे येतात। वारी करणारा तो वारकरी असा त्याचा विग्रह केळा जातो. वारी करणारा तो वारकरी हा अर्थ आज लौकिक अर्थाने व जनमानसात रुढ झालेला आहे. वारी या शब्दाची उत्पत्ती पुढीळ प्रमाणे सांगता येईल।

1] हे. वि. इनामदार यांनी विग्रह करतांना म्हटले आहे की वारकरी या सामजिक शब्दात वार . करी ही पदे असून वार हे प्रतिपादक व करी हे धातुसाधक आहे. वारी करी तो वारकरी असा या शब्दाचा विग्रह आहे असे वाटते.

**वारकरी संप्रदायाचे स्वरुप :—**

वारकरी पंथाचे आराध्य दैंवत हे पंढरपूर येथिल श्री विठ्ठल हे होत म्हणून वारकरी वारीला जात असतांना म्हणत असत की पाउले चालती पंढरीची वाट अशा प्रकारे विठ्ठालाच्या ओढीने सर्व भविक हे आषाढी कर्तिकेला  पंढरपूर येथे वारीला जातात. तेथे हरिचा गजर करत विठ्ठालाच्या सावळ्या रुपाचे दर्शन घेतात. विठ्ठाल हा वैंष्णव पंथीय असल्यामुळे तो विष्णूचा अवतार मानला जातो. परंपरागत वैंदिक व पौरणिक दैंवते टाळत संतांनी विठ्ठालाच आपले मुख्य आराध्य केले. ही बाब महाराष्टींय सांस्कतीक इतिहासाच्या दृस्तीने लक्षणीय आहे. तो विष्णू मानला  गेला तरी विष्णूचा चोविस अवतारात व विष्णू सहस्त्रनामात न सापडणारा पण जनमानसात व श्रध्देच्या विश्वात जो ब्रम्हांडाचा निर्माता आहे तो कृष्ण ही मानला गेला आहे.

पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराला चौ—यांशीची शीला म्हणून ओळखळे जाते। याबाबत दादा गोरे म्हणतात की अशा  शिळेस पाठ लावली म्हणजे मनुष्याच्या चौ—यांशी योनीतून मुक्तता होते अशी समजूत आहे यावरुन असे वाटते की विठ्ठल मंदिराचे महात्म किती थोर आहे हे त्यांनी सुचित केले आहे असे वाटते. म्हणून सर्व भविक आनंदाने भक्ति— भावाने पंढरपूरच्या यात्रेला जातात. वारकरी संप्रदायाचे आद्य प्रर्वतक म्हणून संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांना मानले जाते. म्हणूनच संत बहिणाबाई यांनी आपल्या अभंगात म्हटले आहे की

संतकृपा झाली । इमारत पळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभरिळे देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।
जनार्दनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत ।
भजन करारे सावकाश । तुका झालासे कळस।

बहिणाबाईच्या या अभंगात सर्व वारकरी पंथाचे स्वरुप सामावलेले आहे. संत ज्ञानदेव संत नामदेव यांनी वारकरी पंथाचे मूळ रुजविले आणि त्याचा विस्तार संत एकनाथ संत तुकाराम यांनी केला असे बहिणाबाई यांनी सांगितले आहे. म्हणजे यादव

काळात उदयाला आलेला हा पंथ पुढे विस्तारत गेला असे वाटते.

**मराठवाड्यातील संत**

**संत नामदेव :–**

संत मंडळीत अग्रस्थानी संत नामदेव यांना मान आहे. संत नामदेव यांचा जन्म परभणी जवळीळ नरसी बामणी येथे एका शिंपी कुटूंबात झाला. त्यांना त्यांच्या वडीलाकडून भक्तीचा वारसा मिळाला . त्यांच्या नावावर आज 2500 अभंग उपलब्ध आहे. संत नामदेवांची अभंगवाणी अशा अभंगाच्या संग्रहात ते असे म्हणतात की

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी।

संत नामदेवाची अभंगवाणी साधी सरळ व प्रेमळ असून अनुभव संपन्न आहे असे वाटते. याबाबत सदशिव सरकटे असे म्हणतात की भक्तीचा मळा पाजूळवणारे संत नामदेवाचे अभंग केवळ मराठी मनातच नव्हे तर ते मराठी मुलूखाच्याही बाहेर प्रवास करत आहे भागवत धर्माचा प्रसार व प्रचार त्यांनी आपल्या वाणीने पंजाबपर्यत केला होता.गुरु ग्रंथ साहेबा या ग्रंथात संत नामदेवाच्या अभंगाला नामयाची मुखबाणी असे ही म्हटले आहे.

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले त्यांनी आदी तीर्थवळी व समाधी अशा तीन प्रकरणांतून ते रेखाटले आहे.

**संत गोरा कुंभार :–**

संत गोरोबा हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर ढोकी या गावचे होते. संत मंडळीमध्ये वयाने जेष्ठ असल्याने त्यांना काका असे संबोधले जात असे. परब्रम्ह म्हातारा निवाळा अंतरी वैंराग्याचे वरी पाल्हळळा अशा शब्दात मुक्ता बाईने त्यांचा गौरव केला.

गोरोबा आपल्या अभंगात असे म्हणतात

अंतरीचे गुज बोळू ऐसे काही । वर्ण नाही शब्द शून्य।।

अत्यंत कमी शब्दात उच्च दर्जाचा अध्यत्मिक अनुभव साकार केला असे वाटते. त्यांच्या अभंगाची संख्या कमी जरी असली तरी गुणांच्या बाबतीत ती श्रेष्ठ आहे.

**विसोबा खेचर :–**

विसोबा खेचर हे औंढा नागनाथ येथे राहत असत. संत ज्ञानदेव व संत सोपान देवांचे शिष्य असलेले विसोबा संत नामदेवांचे गुरु ठरले ते आपल्या अभंगात म्हणतात

माझी मूळ पीठिका सोपान। सदगुरु तेणे माथा करू ठेवियला।।

या अभंगात त्यांनी सोपानदेवांची कृपा लाभल्याचा उल्लेख केला .

**संत ज्ञानेश्वर :–**

संत ज्ञानेश्वर यांचे जन्मगांव पैंठण जवळील आपेगाव होय. त्यांनी ज्ञानेश्वरी अमृतानुभव चांगदेव पासष्टी हरिपाठ आणि अभंग असे सहित्य लिहिले. ते आपल्या अभंगात लिहितात

निर्जिव दगडाची काय करिसी सेवा।

तो तुज निर्दैवा देईळ काय।

अशा अभंगातून त्यांनी कर्मकांडावर टिका केली आहे असे वाटते.

म्हणोनि कुळ जतिवर्ण हे अवघेची गा अकारण

या अभंगातुन विवेकनिष्ठ मानवतावादाचा विचार त्यांनी मांडला .

**संत एकनाथः–**

संत एकनाथ हे पैंठणचे होते. त्यांनी वारकारी संप्रदायाचे कार्य चालविण्याची जबाबदारी स्विकारली.नाथांनी चतु:श्लोकी भागवत एकनाथी भागवत रुख्मिणी स्वयंवर भावार्थ रामायण भारुडे गवळणी अभंग व पदे इत्यादी सहित्य त्यांनी लिहिली आहेत० नाथांनी समतेचा विचार अभंगातून मांडला आहे. त्यांनी अभंगाबरोबरच काही भारुड ही रचली आहे . नाथांच्या सहित्याबाबत प्रा। लुळेकर म्हणतात नाथांनी लोकशिक्षणाची भूमिका स्वीकारुन सदह्यधर्माची शिकवण दिली. याबाबत असे म्हणता येईल की त्यांनी सर्व समाज भक्ति सुत्राने बांधला असे वाटते.

**समर्थ रामदासः–**

समर्थ रामदास हे जांबसमर्थ येथीळ रहिवाशी होते. त्यांनी मनाचे श्लोक दासबोध यासारखे ग्रंथ रचळले ते म्हणतात

अशा प्रकारे मराठवड्यातील संतांनी भागवत धर्माची पताका व वारकरी संप्रदाय पुढे नेण्यास मदत केली .

**निष्कर्ष :–**

1] संताच्या अभंगात अध्यत्मिक उकल करण्याचे विचार आहेत.

2] संत सहित्य जीवनानुभव व्य५६त करणारे आहे.

3] सर्वसमावेशकता संताच्या अभंगात आहे।

4] कर्मठपणा नाकारणारे आहे।

5] संत सहित्यात व्यवहारीक प्रतिमेचा वापर करुन प्रचार व प्रसार केला गेला.

6] साधी सरळ व सर्व सामान्य लोकांना समजेल अशा भाषेचा वापर केला .

7] एकतेचा व समतेचा संदेश दिला .

**संदर्भ सूची**

1] संजय सोनवणी :विठ्ठालाचा नवा शोध सुगावा प्रकाशन पुणे

2] दादा गोरे :आधुनिक भाषा विज्ञान आणि मराठी भाषा कैलास पब्लिकेशन औरंगाबाद

3]सदशिव सरकटे : मध्ययुगीन मराठी वाड।मयाचा इतिहास आरंभ ते १८००, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद,

4] प्रल्हाद ळुळेकर : मराठवाड्यातील सहित्य कैलास पब्लिकेशन औरंगाबाद